# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४००००१

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स २२६९२१०२

तार - EDUTECH E-mail :- desk1@dte.org.in internet :- http://www.dte.org.in


क्र. ४-४अ/तंशिसं/वसतिगृह/२०१३/४४९

दिनांक : 21 DEC 2013

प्रति,

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय : मुलींच्या वसतिगृहासाठी वॉर्डन पदाचा कार्यभार देणे तसेच वसतिगृहाच्या आवारातील निवासी व्यवस्था इत्यादीबाबत...

संचालनालयाचे पत्र क्र.४/एपीवाय/१९९७/३९०९५, दि.१८/११/१९९७ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार समिती गठीत करुन वॉर्डन पदाचा कार्यभार देण्याची कार्यपध्दती घालून देण्यात आलेली आहे. मात्र सध्या वसतिगृहाची जबाबदारी प्राचार्यांच्या स्तरावरुन सोपविली जात असल्याचे निदर्शनास येते.

मा. सर्वोच्च न्यायालयाने **विशाखा** निवाडयामध्ये दिलेली मार्गदर्शक तत्वे व **निर्भया** प्रकरणानंतर शासन स्तरावरुन वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेता वसतिगृहात राहणा-या मुलींसाठी सुरक्षित वातावरण निर्मितीच्या दृष्टीने मुलींच्या वसतिगृहाची जबाबदारी सोपविताना खालील बाबी कटाक्षाने पाळल्या जाव्यात याची सर्व संस्था प्रमुखांना आपल्या स्तरावरुन जाणीव करुन देण्यात यावी.

१. मुलींच्या वसतिगृहासाठी वॉर्डन म्हणून प्राचार्यांनी केवळ महिला अधिका-यांचीच नेमणूक करावी. यापूर्वी पुरुष अधिका-यांची नेमणूक केलेली असल्यास ती त्वरीत रद्दबातल ठरवून नव्याने नेमणूक करण्यात यावी.
२. मुलींच्या वसतिगृह आवारात वॉर्डन यांचे निवासस्थान असल्यास ते निवासस्थान केवळ उपरोक्त क्र.१ मध्ये नमूद केल्यानुसार नियुक्त केलेल्या महिला अधिका-यांनाच देण्यात यावे. यापूर्वी पुरुष अधिका-यांना असे निवासस्थान दिलेले असल्यास ते तात्काळ रिक्त करुन घेण्यात यावे.
३. मुलींच्या वसतिगृह इमारतीत वसतिगृहाचे कार्यालय असल्यास व तेथे वसतिगृह लिपिकाची नियुक्ती केलेली असल्यास तेथील कामकाज शक्यतो महिला लिपिकांकडेच सोपवावे.
४. महिला वसतिगृह आवारातील प्रसाधनगृहाचे व साफसफाईचे कामकाज शक्यतो महिला सफाईगाराकडेच सोपवावे. सफाईसेवेसाठी सेवा करार केलेला असल्यास सदर करार करण्यात आलेल्या संस्थेला सदर कामासाठी महिला सफाईगार नेमण्याबाबत सूचीत करावे.
५. महिला वसतिगृहाच्या मेसच्या परिसरात कंत्राटदारांकडील पुरुष कर्मचारी रात्री निवासाला असतात असे कांही संस्थांमध्ये आढळून आलेले आहे. तेव्हा संस्था प्रमुखांनी उपरोक्त बाबीला त्वरीत पायबंद घालावा.

उपरोक्त सूचनांचे उल्लंघन ज्या संस्था प्रमुखांकडून होईल त्यांना यासाठी व्यक्तीशः जबाबदार धरुन कार्यवाही केली जाईल याबाबतची जाणीव त्यांना करुन देण्यात यावी. सहसंचालकांनी संस्थेला दिल्या जाणा-या भेटी आणि त्यांचेकडून घेण्यात येत असलेल्या आढाव्याच्यावेळी उपरोक्त बाबींचे अनुपालन होते किंवा कसे याची खातरजमा करावी. उल्लंघन होत असल्यास त्याबाबत संबंधीतांविरुध्द करावयाच्या कार्यवाही संदर्भातील प्रस्ताव वेळीच संचालनालयास सादर करावा.

( दयानंद मेश्राम )
सहसंचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य
मुंबई

पृष्ठांकन क्र. विकाऔ/शिक्षण/२०१३/२५
दिनांक : - 4 JAN 2014

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद अधिनस्त, प्राचार्य, शासकिय पदवी, पदविका संस्था यांना त्वरीत अनुपालनासाठी.

सह संचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
औरंगाबाद

या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना सुचित करण्यात येते की, सदर पत्र कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावे.

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

क्रमांक : ४/एपीवाय/१९९७/३९०९५

दिनांक : १८/११/१९९७

१] सह संचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये,

२] प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी
महाविद्यालये,

३] प्राचार्य
शासकीय औषधनिर्माणशास्त्र
महाविद्यालय, कराड, यांस.

विषय :- शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय व शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय आणि शासकीय तंत्र निकेतन येथील वसतिगृहात कुलमंत्री, उपकुलमंत्री इत्यादी नेमण्याबाबत.

शासनाने, शासन पत्र क्रमांक जीईसी १०९७/८९८५/[५०/९७]/तांशि-१, दिनांक १ ऑगस्ट, १९९७ अन्वये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये आणि शासकीय तंत्र निकेतने येथील वसतिगृहात कुलमंत्री, उपकुलमंत्री इत्यादी नेमणूकासंबंधी निवड समितीची पुर्नरचना करुन नवीन समिती गठीत करण्यात आली आहे.

सोबत शासन पत्र दि. १-८-१९९७ ची प्रत माहितीसाठी पाठवित आहे.

येथे असे निदर्शनास आणण्यात येते की, सदर समितीपूर्वी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय व शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात कुलमंत्री व उपकुलमंत्री यांच्या नियुक्त्या पूर्वीच करण्यात आलेल्या आहेत, त्यांची माहिती सोबतच्या प्रपत्रात पाठविण्यात यावी.

[र. पां. केळकर]
सहाय्यक संचालक
तंत्र शिक्षण, म. रा., मुंबई.

महाराष्ट्र शासन

क्रमांक :- जीईसी-१०९७/८९८५/[५०/९५]तांशि-१
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- 7 ऑगस्ट, १९९७.

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण
महाराष्ट्र राज्य,
मुंबई - १.

विषय :- शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, व शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय आणि शासकीय तंत्रनिकेतन येथील वसतीगृहात कुलमंत्री, उपकुलमंत्री इत्यादी नेमण्याबाबत....

उपरोक्त विषयासंदर्भातील आपण आपले क्र.४/स्पोवाय/१९९७/२६९४३ दिनांक १५ जुलै १९९७ चे पत्र पहावे.

२. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांक-जीईसी-१०९५/२५५४/[६७५३]/तांशि-१ दिनांक २९ एप्रिल १९९५ अन्वये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतने येथील वसतीगृहात कुलमंत्री, उपकुलमंत्री इ. नेमण्यासाठी खालीलप्रमाणे निवड समितीची पुर्नरचना करून समिती गठीत करण्यासाठी मंजूरी देण्यात आली आहे :-

| | |
|---|---|
| १] उपसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय | अध्यक्ष |
| २] संस्थेचे प्राचार्य | सदस्य |
| ३] संचालकांनी नामनिर्देशित केलेले दुसऱ्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये/शासकीय तंत्रनिकेतनाचे प्राचार्य. | सदस्य |

तथापि, शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. टिईडी-१०९४/[६६६४]/तांशि-१, दि. ११ डिसेंबर १९९५ अन्वये विभागीय कार्यालयातील उपसंचालक, तंत्रशिक्षण ही पदे श्रेणीवाढ करून सहसंचालक, तंत्रशिक्षण [प्रशासन] या पदात रूपांतरीत करण्यासाठी मंजूरी देण्यात आली असल्यामुळे व त्याप्रमाणे ही पदे भरण्यात आली असल्यामुळे आता दि. २९ एप्रिल १९९५ च्या वरील पत्रातील अनुक्रमांक१ मध्ये "उपसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय" या ऐवजी "सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय" असे वाचण्यात यावे.

[ स. जे. सपांगेकर ]
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

संचालनालय राज्य, मुंबई
जी १५०९
८-८-९६